# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.08.2024** **वारःशनिवार**

---

1. युक्रेन-रशिया दरम्यानच्या संघर्षावर उभय देशांनी मार्ग काढण्याचं भारताचं आवाहन
2. अंतरिक्ष क्षेत्राव्यतिरिक्त देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासातही इस्रोचं लक्षणीय योगदान- पहिल्या अंतरिक्ष दिवसानिमित्त राष्ट्रपतींचं प्रतिपादन.
3. कीटकनाशकांचा वापरात घट करण्यासाठी आंतरमंत्रालयीन समिती स्थापन करण्याची केंद्राची राज्यांना सूचना
4. राजकीय पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नसल्याचं सांगत महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र बंदला उच्च न्यायालयाकडून मनाई आणि
5. नेपाळमध्ये नदीत बस पडून 27 जणांचा मृत्यू, महाराष्ट्रातल्या 24 जणांचा समावेश

**युक्रेन-रशिया पंतप्रधान सल्ला**

युक्रेन आणि रशिया या देशांनी सद्यस्थितीत सुरू असलेल्या संघर्षावर मार्ग शोधला पाहिजे, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उभय देशांना केलं. युक्रेनच्या दौऱ्यात, शांतता प्रस्थापित करण्याच्या सर्व प्रयत्नांमध्ये भारत सक्रीय भूमिका निभावेल अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली. युक्रेनचे राष्ट्राअध्यक्ष व्लोदिमिर झेलेन्स्की यांच्यासोबत भेटीदरम्यान मोदी यांनी भारताची भूमिका स्पष्ट केली. मोदी म्हणाले की, लोककेंद्रीत दृष्टीकोन ठेवून शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांची सक्रीय योजना भारतानं आखली आहे. भारत नेहमीच सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडत्वाचे समर्थन करतो.

रशियाच्या दौऱ्याविषयी बोलताना मोदी म्हणाले की, युद्धभुमीवर कोणत्याही समस्येचा तोडगा सापडत नाही, तर केवळ चर्चा, संवाद आणि मुत्सद्देगिरी यांच्या जोरावर मार्ग सापडत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. याचवेळी, युक्रेन-रशिया संघर्षाच्या सुरुवातीच्या टप्प्यात भारतीय विद्यार्थी आणि नागरिकांना देशाबाहेर जाण्यात मदत केल्याबद्दल त्यांनी युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांचे आभार मानले तसंच भारत कोणत्याही मानवतावादी मदतीस तयार असल्याची ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

भारत-युक्रेन दरम्यान काल कीव इथं दोन्ही देशांच्या पंतप्रधानांमध्ये शिष्टमंडळ स्तरीय बैठक पार पडली. पंतप्रधानांचा हा दौरा काल संपला. या दौऱ्याविषयी प्रसारमाध्यमांविषयी माहिती देताना, परराष्ट्रव्यवहार मंत्री एस. जयशंकर म्हणाले की, उभय देशांदरम्यान द्विपक्षीय संबंध, व्यापार, आर्थिक समस्या, संरक्षण, औषध निर्मिती आणि शेती या विषयांवर प्रामुख्याने चर्चा झाली. तसंच युक्रेन संघर्षावरही दोन्ही नेत्यांनी चर्चा केल्याचं जयशंकर यांनी सांगितलं.

**अंतराळ-राष्ट्रपती**

भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था म्हणजेच इस्रोनं केवळ अंतरिक्ष क्षेत्रातच नव्हे तर देशाच्या सामाजिक आर्थिक विकासातही महत्त्वाचे योगदान दिल्याचं प्रतिपादन काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. पहिल्या राष्ट्रीय

अंतरिक्ष दिनाच्या कार्यक्रमात त्या काल दिल्ली इथं संबोधित करत होत्या. अंतरिक्ष क्षेत्रातल्या प्रगतीमुळे आरोग्य, वाहातूक, पर्यावरण, उर्जासुरक्षा, माहिती तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांना लाभभ झाला आहे असे सांगून राष्ट्रपती म्हणाल्या की, अंतराळ संशोधनामुळे मानवी क्षमतांमध्ये वाढ झाली आहे. कल्पना वास्तवात रुपांतरीत होऊ शकल्या तसंच विश्वाची रहस्येही उलगडत आहेत. इस्रोचं चांद्रयान चंद्रावर उतरले तो क्षण देशवासियांसाठी गौरवशाली होता असं सांगून त्या पुढे म्हणाल्या की, राष्ट्रीय अंतरिक्ष दिवस साजरा करणं हे कौतुकास्पद पाऊल आहे. भारतीय अंतरिक्ष क्षेत्राची झालेली वृद्धी विलक्षण असून, किमान संसाधनांतून आकाराला आलेली मंगळयान मोहिम असो किंवा एकाच वेळी 100 उपग्रह प्रक्षेपित करणे असो, अनेक पराक्रम इस्रोनं केले आहेत. इस्रोच्या 2030 पर्यंत कचरामुक्त अंतरिक्षमोहिमा करण्याच्या योजनेचे कौतुक राष्ट्रपतींनी केलं.

अंतरिक्ष राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह म्हणाले की, गेली सत्तर वर्ष स्वतःच लादून घेतलेल्या गुप्ततेच्या पडद्याआड काम करत राहिल्यानं हे क्षेत्र ज्ञान आणि संसाधनं यांच्यापासून वंचित राहिले होते. राष्ट्रीय अंतरिक्ष दिवस देशभरात मंत्रालये, विविध विभाग, शैक्षणिक संस्था, वैज्ञानिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि सामान्य नागरिकांच्या सहभागातून साजरा होत असल्याचं  इस्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी सांगितलं. दरम्यान, याच कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते इस्रो आयोजित रोबोटिक्स चॅलेंज आणि भारतीय अंतराळ हॅकेथॉन स्पर्धांच्या विजेत्यांना बक्षीसेही देण्यात आली.

**<u>किटकनाशक</u>**

भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक संस्था एफएसएसएआय नं कीटकनाशकांचा वापर कमी करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी आंतरमंत्रालयीन समिती स्थापन करण्याचं तसंच शेतकऱ्यांच्या स्तरावर कीटकनाशकांचे निरीक्षण आणि नियमन करण्यासाठी धोरणं विकसित करण्याचं आवाहन राज्यांना केलं आहे. केंद्रीय सल्लागार समितीच्या 44 व्या बैठकीला संबोधित करताना, संस्थेच्या कार्यकारी अध्यक्ष कमला वर्धन राव म्हणाले, कृषी पद्धती सुरक्षित आणि टिकून ठेवण्याचा उद्देश यामागे आहे. यामुळे अन्नातल्या कीटकनाशकांच्या अवशेषांशी संबंधित संभाव्य आरोग्य धोक्यांपासून ग्राहकांचं संरक्षण देखील होणार असल्याचंही ते म्हणाले. त्याशिवाय राज्यात फिरत्या खाद्यपदार्थ तपासणी प्रयोगशाळा तैनात करता येऊ शकतील अशा जागा शोधाव्यात अशा सूचना राव यांनी केल्या आहेत. या फिरत्या प्रयोगशाळा ग्राहक जागरुकता वाढवण्यासाठी आणि अन्न सुरक्षा पद्धतीविषयी महत्त्वाची माहिती प्रसारित करण्यासाठी महत्त्वाच्या ठरू शकतील असेही त्यांनी नमूद केलं.

**<u>दूधमानक</u>**

ए-वन आणि ए-2 प्रकारचं दूध आणि दुधाची उत्पादनं यांच्या सर्व पाकिटांवरील सर्व दावे तत्काळ काढून टाकावेत असा आदेश भारतीय अन्न सुरक्षितता आणि मानक प्राधिकरणानं दिला आहे. अन्न व्यवसाय कंपन्या FSSAI च्या परवाना क्रमांकाखाली दुध आणि दुधाची उत्पादनं ए-वन आणि ए-2 वर्गीकरणात विकत असल्यामुळं हा आदेश देण्यात आला आहे. दुधाचं ए-वन आणि ए-2 वर्गीकरण प्रथिनाच्या संरचनेतील फरकाशी निगडीत आहे त्यामुळे ए-2 चे कोणतेही दावे दिशाभूल करणारे आणि कायदेबाह्य असल्याचं प्राधिकरणानं स्पष्ट केलं आहे.

**<u>राजनाथ-अमेरिका</u>**

संरक्षणमंत्री राजनाथसिंह आणि अमेरिकेचे संरक्षणसचिव लॉईड ऑस्टिन यांच्यात काल रात्री द्वीपक्षीय बैठक पार पडली. उभय देशांदरम्यान द्वीपक्षीय संरक्षण सहकार्य, औद्योगिक सहकार्य, प्रादेशिक सुरक्षा आणि इतर आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर व्यापक चर्चा केली. या चर्चेदरम्यान, गेल्यावर्षी स्वीकारलेल्या, उभय देशातल्या संरक्षण औद्योगिक सहकार्य आराखड्यातल्या सहविकास आणि सहउत्पादन यांच्या भारतातल्या संधींवर संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी प्रकाश टाकला. उभय देशातल्या पुरवठा सुरक्षा सामंजस्य करारावर दोन्ही देशांच्या मंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं. गुरूवारी स्वाक्षरी झालेल्या या करारामुळे उभय देशांच्या संरक्षण औद्योगिक परिसंस्थांना

प्रोत्साहन मिळेल तसंच पुरवठासाखळीतली लवचिकता वाढेल. भारत अमेरिकेतल्या फ्लोरिडा मुख्यालयात विशेष ऑपरेशन कमांडमध्ये संपर्क अधिकारी तैनात करणार आहे.

**<u>गिरीराजसिंह न विणलेले कापड</u>**

देशात मध्यमवर्गियांच्या राहणीमानाचा दर्जा वाढल्यानं, हातानं न विणलेले कापड दैनंदिन जीवनाचा भाग झाला असून, त्याची मागणी सातत्यानं वाढत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराजसिंह यांनी काल म्हटलं आहे. मुंबईत आयोजित 10 व्या नॉन वुवन टेक आशिया आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कृषी, आरोग्य, स्वच्छता आदी क्षेत्रातल्या हाताने न विणलेल्या उत्पादनांच्या नाविन्यपूर्ण गरजांवर भर देत, शाश्वततेचं महत्त्व आणि या कापड क्षेत्राची रोजगारवृद्धीतली भूमिका गिरीराज सिंह यांनी अधोरेखित केली. हे तंत्रज्ञान केवळ आरोग्य क्षेत्रापुरते मर्यादित न राहाता भविष्यात कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणू शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<u>केजरीवाल</u>**

केंद्रीय तपास संस्थेनं काल, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणात खटला चालवण्यासाठी आवश्यक मंजुरी मिळवली आहे. सीबीआयनं केजरीवाल यांच्या विरोधात पुरवणी आरोपपत्रही दाखल केलं असून 27 ऑगस्टला राऊस एव्हेन्यू न्यायालयात त्यावर विचार होईल.

**<u>उच्चन्यायालय-बंद</u>**

महाराष्ट्रात, बदलापूर इथं लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडीनं आज महाराष्ट्र बंदची हाक दिली होती; मात्र यासाठी मुंबई उच्च न्यायालयानं काल एका सुनावणी याचिकेवर मनाई केली आहे. कोणत्याही राजकीय पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नसल्याचं न्यायालयानं स्पष्ट केलं. या प्रकरणी न्यायालयानं महाविकास आघाडीचे घटक पक्ष, राज्य सरकार आणि गृहविभागाला नोटीस बजावली असून त्यात न्यायालयानं दिलेल्या आदेशांचं पालन करण्याचे आदेश दिले आहेत.

**<u>नेपाळ</u>**

नेपाळमध्ये बस नदीत पडून झालेल्या अपघातात 27 जणांचा मृत्यू झाला असून यात महाराष्ट्रातल्या जळगाव जिल्ह्यातील 24 जणांचा समावेश आहे. या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला आहे. या अपघातातील मृतदेह तातडीनं महाराष्ट्रात आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि वरीष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला. हे सर्व मृतदेह वायुसेनेच्या विमानानं आज नाशिक इथं आणण्यात येतील; त्यानंतर ते त्यांच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात येणार आहेत.

# याबरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.